# "नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका


कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)


।।सर्वेषु भूतेषु दया हि धर्मः।।

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ


मूल्य रु. ५

| क्रमांक ४ | वर्ष : ३५ | जानेवारी-मार्च २०१४ |
|---|---|---|

**BOOK PACKET (PERIODICAL)**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80


**TO,**


**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सौ. नीला | व | श्री. दिगंबर महाबळेश्वर कसबेकर | – | अंधेरी |
| सौ. उमाबाई (कुंदा) | व | श्री. अनंत त्रिंबक कसबेकर | – | दादर |
| सौ. दुर्गाबाई | व | श्री. लक्ष्मीकांत वामन वागळे | – | कारवार |
| सौ. पुष्पा | व | श्री. पद्माकर श्रीपाद तेलंग | – | वांद्रे |

## ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | |
|---|---|
| नागेश बाळकृष्ण बर्डे | माहीम |
| किशोर दत्तात्रय बोरकर | दादर |
| किशोर रामचंद्र भेंडे | जोगेश्वरी |
| शशिकांत नारायण दळवी | बोरीवली |
| ललिता महाबळेश्वर दिवेकर | अंकोला |
| मंगला मारुति गायतोंडे | जोगेश्वरी |
| शामला माधव कामत | कारवार |
| अरुण भास्कर कसबेकर | चर्चगेट |
| सतीश विठ्ठल कसबेकर | पुणे |
| निर्मला मंगेश केरकर | मुलुंड |
| सदानंद दिनकर लाड | ठाणे |
| महेश मंगेश मुझुमदार | गोवा |
| शरयू दत्तात्रय नाडकर्णी | पारले |
| सुरेश दुर्गप्पा नाडकर्णी | ठाणे |
| जगदीश शंकर नाडकर्णी | वाशी |
| निशिकांत लजपत नाडकर्णी | अंधेरी |
| निलीमा शशिकांत नाडकर्णी | माहीम |
| मंदा शशिकांत पत्की | सायन |
| सुधा चंद्रकांत फडणीस | प्रभादेवी |
| महेश्वर सदाशिव पिकळे | अंधेरी |
| दुर्गादास विठ्ठल रामाणी | प्रभादेवी |
| रघुनाथ शंकर सोहोनी | वांद्रे |
| शरद गोपीनाथ वाघ | गांवदेवी |
| अरविंद मंगेश वाघ | चेंबूर |
| अजित विश्वनाथ वागळे | माहीम |
| उषा शिवराम वागळे | पारले |
| मंगेश शामराव वागळे | ठाणे |
| पंढरीनाथ वामन वागळे | गोरेगाव |
| सतीश सीताराम वागळे | गोरेगाव |
| शीला मोहन वागळे | माहीम |

# संपादकीय

## समाजसेवानिधीचा विनियोग

मुखपत्रिकेच्या प्रत्येक अंकात संघाला व एज्युकेशन सोसायटीला मिळालेल्या देणग्यांची माहिती देण्यात येते. या रकमेचा विनियोग कसा होतो व गरजू व्यक्तींना किती साहाय्य मिळते त्याचा तपशील वार्षिक अहवालात दिला जातो. ही माहिती सर्व वाचकांनाही वेळोवेळी देणे गरजेचे आहे.

संघाला मिळणाऱ्या देणग्यांची रक्कम बँकांमध्ये मुदत ठेवीच्या रुपाने गुंतविण्यात येते, त्यावरील व्याज व इतर देणग्या हे त्या वर्षाचे उत्पन्न म्हणून गणले जाते व या उत्पन्नातून प्रशासकीय खर्च वजा जाता शिल्लक रकमेंतून लाभार्थींना साहाय्य दिले जाते. सध्या ४४ कुंटुबाना अवलंबून असलेल्या व्यक्तीनुसार प्रत्येक कुटुंबाला मासिक सरासरी रु. २५०० एवढे साहाय्य मिळते. त्याशिवाय २० ज्येष्ठ नागरिकांना मासिक रु. २७०० एवढे साहाय्य मिळते. त्याशिवाय वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ गेल्या आर्थिक वर्षात कॅन्सर, हॉर्ट अशा प्रकारच्या व्याधिग्रस्तांसह ३८ रुग्णांना सुमारे ८ लाख रुपयांची मदत करण्यांत आली.

अलीकडे विवाहखर्च, विशेषत: मुलीकडील असल्यास, आवाक्याबाहेर जातो अशावेळी खर्चाचा पूर्ण बोजा उचलता येत नसला तरी ज्ञातीतर्फे मंगळसूत्राचे तरी प्रायोजन करावे म्हणून अशावेळी अर्जदारांना २५ हजार रुपये देण्याची तजवीज करण्यात येते.

दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाईमुळे या साहाय्यात वाढ करणे आवश्यक असते. उदार ज्ञातिबांधवाकडून सतत मिळणाऱ्या देणग्यांमुळेच वेळोवळी ही वाढ करणे शक्य होते.

**नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा**
**१ जानेवारी २०१४**

**सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे**
**(अतिथी संपादक)**

## हळदीकुंकू समारंभ - भगिनींस आमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा हळदीकुंकू समारंभ यंदा माहीम व मुलुंड येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळांत वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती

| | **माहीम** | **मुलुंड** |
|---|---|---|
| **तारीख** | मंगळवार १४ जानेवारी २०१४ | शुक्रवार २४ जानेवारी २०१४ |
| **कार्यस्थळ** | माटुंगा मित्रमंडळ<br>एफ ४, कर्नाटक बिल्डिंग,<br>मोगल लेन, माहीम. | सौ. स्मिता उदय वाघ यांच्या निवासस्थानी<br>२०४, पूर्णिमा दर्शन, ९० फीट रोड, फडके रोड,<br>अंबिका प्लाझा जवळ, मुलुंड (पूर्व). |
| **वेळ** | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ५ ते ७ |
| | **संघ कार्यकारिणीतर्फे**<br>सौ. किशोरी अ. वागळे<br>सौ. शोभा प्र. कामत | **सांस्कृतिक मंचतर्फे**<br>सौ. स्मिता वाघ - २५६३ ६८३७<br>श्रीमती मंजिरी कुलकर्णी |

## वार्षिक स्नेहसंमेलन

दरवर्षीप्रमाणे यंदाही भरलेले आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन २४ नोव्हेंबर २०१३ रोजी नेहमीप्रमाणे उत्साहाने पार पडले. डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्टचे सभागृह जवळजवळ पाचशे प्रेक्षकांनी तुडुंब भरलेले होते. प्रमुख पाहुणे म्हणून फिजियोथेरपी अध्यापन क्षेत्रातील तज्ज्ञ श्रीमती सुजाता (सरल) सुधीर यार्दी ह्या उपस्थित होत्या. त्यांचा परिचय मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात दिलेलाच आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सुजाता केणी यांनी उत्कृष्टपणे केले. ध्वनिमुद्रित स्वागत गीतानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. मुख्य कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी निधन झालेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृतीप्रीत्यर्थ स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यानंतर श्री. देवदास नाडकर्णी यांनी दिवंगत श्री. अरविंद कुलकर्णी, डॉ. विनायकराव नाडकर्णी व श्री. महाबळेश्वर (संजय) नाडकर्णी यांच्या कार्याची विस्तृत माहिती करुन दिली व त्यांना आदरांजली वाहिली.

यानंतर ज्ञातीतर्फे प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देण्यात आले. संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी व एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गेल्या वर्षीच्या ठळक घटनांचा आढावा घेतला. यानंतर श्री. गणपती नाडकर्णी यांनी उपस्थितांना प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली.

प्रमुख पाहुणे श्रीमती सुजाता यार्दी यांनी आईवडिलांचे स्मरण करुन मराठी भाषेतून सहज सोप्या भाषेत आपले विचार मांडले व ते सर्वांनाच भावले. पालकांनी आपल्या मुलांवर योग्य संस्कार केले पाहिजेत व तसेच त्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्यांच्यावर चांगले ऊर्जात्मक विचार भरवले तर काही वर्षात त्याची परतफेड आपणास मिळेल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. आपण कोणता व्यवसाय अचूक निवडावा अगर कोणता शिक्षणक्रम घ्यावा, याबद्दल बहुसंख्य मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या मनांत संदेह असतो. यासाठीच कोणताही शिक्षणक्रम किंवा करिअर निवडण्यापूर्वी मुलांनी आपला कल, आपली आवड व आपल्या बुध्दीची कुवत जाणून घेणे आवश्यक असते. असे त्यांनी आवर्जून सांगितले. बाल्यापासून वृध्दापकाळापर्यंतचे वेगवेगळे टप्पे, त्यांत येणाऱ्या अडचणी व मानसिक तणाव कसे दूर करावेत याविषयी थोडक्यात पण अतिशय सुंदर असे मोलाचे मार्गदर्शन केले. शेवटी जेष्ठ नागरिकांनाही आनंदी जीवनाची गुरुकिल्ली देण्याचे महत्वपूर्ण कामही त्यांनी केले. व आपल्या गुरुजनांना, आई-वडिलांना व देशाला विसरु नका असा संदेश दिला.

संघातर्फे कर्मयोगी दुर्गानंद गायतोंडे व श्री. वसंत कसबेकर यांच्या कार्याची शिरीष वाघ यांनी ओळख करुन दिली. श्री. गायतोंडे यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ,

स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला व त्यांच्या यशस्वी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. तसेच श्री. वसंत कसबेकर यांचा निधनोत्तर सत्कार करण्यात आला. त्यांची प्रतिनिधी म्हणून त्यांची कनिष्ठ भगिनी श्रीमती सुमन देसाई यांनी पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह यांचा स्वीकार केला. एज्युकेशन सोसायटीतर्फे श्री. दिलीप मुझुमदार यांना सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे चिरंजीव व आपल्या बँकेचे संचालक श्री. कौशल मुझुमदार यांनी पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह यांचा स्वीकार केला. नंतर ज्ञातीतील सहा विद्यार्थी कु. स्तृती नाडकर्णी, कु. विराज नाडकर्णी. कु. करण मुझुमदार, कु. रमांगी आरस, कु. नुपूर प्रभू, कु. सुज्ञा देसाई यांनी विशेष प्रावीण्य मिळविले, त्यांची माहिती सौ. सुजाता केणी यांनी उपस्थितांना करुन दिली. एज्युकेशन सोसायटीतर्फे खास पारितोषिके देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या सर्वांच्या प्रावीण्याची मुखपत्रिकेत दखल घेण्यात आलेलीच आहे.

मध्यन्तरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे विवाहाची सुवर्णजयंती गाठणाऱ्या चार जोडप्यांचा व वयाचा अमृतमहोत्सव साजरा करण्याऱ्या तीस ज्येष्ठ व्यक्तींचा स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. या सत्कार सोहळ्यानंतर कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना श्रीमती सुजाता यार्दी यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली. तसेच ज्ञातीतील ७२ हुशार विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ झाला. त्याचे निवेदन श्रीमती गीता संझगिरी यांनी केले.

विवाहाची सुवर्णजयंती गाठणाऱ्या जोडप्यांतील सौभाग्यवतींना ओटी खण देताना सौ. सुप्रिया कुलकर्णी हिने पारंपरिक नऊवारी साडी परिधान करुन कार्यक्रमाची शोभ वाढविली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यात ठाणे मंचचे उत्साही कार्यकर्ते तसेच राजू बोरकर, राजीव गायतोंडे इत्यादींनी विशेष हातभार लावला. मृदुला भांडारकर यांचे योगदान तर सर्वश्रुतच आहे. श्री. शिरीष वाघ यांच्या आभार प्रदर्शनाच्या भाषणाने व राष्ट्रगीताने या हृद्य सोहळ्याची सांगता झाली.

**सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे, माहीम**

## प्रकाशझोत

### 'GUIDE FOR SHREE MANGUESH MAHAJANS'

### एक संग्राह्य संदर्भग्रंथ

श्रीमंगेश देवस्थानासंबंधी आतापर्यंत अनेक पुस्तके लिहिली गेली आहेत. त्यांतील सर्वांत महत्वाचे व परिपूर्ण पुस्तक म्हणजे इतिहासाचार्य कैलासवासी श्री. विनायक नारायण शे. धुमें यांचे 'श्रीमंगेश देवस्थान समग्र इतिहास.' कै. धुमें यांचे बहुश्रुत चिरंजीव श्री. चंद्रनाथ धुमें यांनी अलीकडेच विजयादशमीच्या सुमुहुर्तावर 'Guide for Shree Manguesh Mahajans' हे एक अत्यंत उपयुक्त असे पुस्तक प्रसिध्द केले आहे. प्रत्येक सुजाण महाजन ज्या माहितीच्या प्रतीक्षेत नेहमी असतो ती बहुतेक सर्व माहिती या पुस्तकांत अंतर्भूत केलेली आहे. गोमंतकाचा पूर्वेतिहास, गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीची उत्पत्ती, गोत्र, 'शेणवी' ही उपाधी, कुलदेवतांचा प्राचीन इतिहास, स्थलांतर, महाजनांची यादी, त्यांचे हक्क व त्यांची कर्तव्ये, देवस्थानाचे व्यवस्थापन, नियमावली, धूळभेट, गांठवळ, अभिषेक, महारुद्र इत्यादी देवकृत्यांची माहिती, संस्थानाच्या आवारातील शिष्टाचार, महत्वाचे उत्सव, प्रसाद कौल, कैवल्यपूर मठाची पार्श्वभूमी व इतिहास, तेथील दिनचर्या व कार्यक्रम, अस्ताला जात असलेल्या रुढी व परंपरा यांचे विश्लेषण, इत्यादी अनेक विषयांवर सांगोपांग माहिती या पुस्तकात एकत्रित केलेली आहे. आकर्षक जुने व नवे फोटो, निरनिराळ्या उत्सवाला रथ व पालखी आवारांत फिरतात त्यांचे आराखडे, उत्कृष्ट छपाई यामुळे हे पुस्तक अत्यंत सुबक झालेले आहे. श्री मंगेशाच्या प्रत्येक महाजनाने संदर्भग्रंथ म्हणून हे पुस्तक संग्रही ठेवण्यासारखे आहे.

(पृष्ठसंख्या – २००, मूल्य रु. ३००,
उपलब्ध : श्रीमंगेश देवस्थान व द. ना. नाडकर्णी, विले पारले – २६१२४१६२)

### 'गुढ' व

### 'BE TENSION FREE'

### श्री दुर्गानंद गायतोंडे यांची आणखी दोन पुस्तके प्रकाशित

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात पुण्याचे 'कर्मयोगी दुर्गानंद गायतोंडे' यांच्या बहुआयामी कर्तृत्त्वाची थोडक्यात माहिती दिली होती. २४ नोव्हेंबर रोजी भरलेल्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनांत त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. वयाच्या ९५ व्या वर्षीसुध्दा इतर सामाजिक कार्याशिवाय ते अजूनही चिंतनात व लेखनांत मग्न असतात. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची वेळोवेळी मुखपत्रिकेच्या अंकात दखल घेण्यात येते. अलीकडेच त्यांची आणखी दोन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यातले पहिले 'गूढ' हे पुस्तक एक रहस्यमय कादंबरी

आहे. या कादंबरीचा विषय म्हणजे नरबळी दिल्याने कुठली तरी देवता प्रसन्न होते व ती आपली मनोकामना पूर्ण करते अशी ज्याची धारणा असते अशा एका व्यक्तीविषयी आहे.

दुसरे पुस्तक म्हणजे 'Be Tension Free'. पुस्तकाच्या नावावरुनच त्यातील आशय लक्षात येतो. श्री. गायतोंडे अनेक मोठ्या उद्योगसमुहांत जबाबदारीच्या पदावर होते. त्यांच्या कामाच्या कक्षेनुसार चेअरमनपासून चपराशापर्यंत सर्वांशी त्यांचा सतत संपर्क असे. त्यामुळे त्यांना मिळालेले वास्तवातले ज्ञान इतरांपर्यंत पोचवावे म्हणून निवृत्तीनंतर त्यांनी वेगवेगळ्या कंपनीतील व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांसाठी मार्गदर्शनपर वर्ग घेण्यास सुरुवात केली. भीती, काळजी, अहंकार, स्पर्धा जेव्हा मनांत घर करतात, तेव्हां मानसिक तणाव निर्माण होतो. त्यांना जर मनातून हद्दपार केले तर मन शांत व प्रसन्न राहते हे त्यांच्या लेखनाचे सूत्र आहे. या मूळ इंग्रजी पुस्तकाचे श्रीमती मधुरा नाईक यांनी 'तणावमुक्त जगा' या पुस्तिका रुपात मराठीत रुपांतर केलेले आहे.

('गूढ' पृष्ठ - ११२, मूल्य रु. १२५, 'Be Tension Free' पृष्ठ - ५८, मूल्य रु. ७५
उपलब्ध : उत्कर्ष प्रकाशन, पुणे ०२० - २५५३७९५८)

## 'MAHATMA GANDHI AND PREMA KANTAK EXPLORING A RELATIONSHIP, EXPLORING HISTORY'

### या पुस्तकाचे प्रकाशन

म. गांधी यांच्याविषयी आजवर अनेक लेखकांनी अनेक अंगानी अनेक भाषांतून भरभरुन लिहिलेले आहे. पण गांधीजींच्या समवेत स्वातंत्र्य लढ्यांत असलेल्या गांधीवादी महिलांविषयी फारसे लिखाण नाही. 'मीरा आणि महात्मा' हे एक पुस्तक आहे तरी त्यांत गांधीवादी महिला कार्यकर्त्यांविषयी फारसे आढळून येत नाही. महाराष्ट्रांत गांधीवादी महिलापैकी एक ठळक नांव म्हणजे प्रेमा कंटक. 'सत्याग्रही महाराष्ट्र' हे त्यांचे पुस्तक त्यांच्यावरील गांधीप्रभावाची साक्ष देते. कांही महिन्यापूर्वी गांधी जयंतीच्या (२ ऑक्टोबर) निमित्ताने प्रा. मीरा कोसंबी या विदुषीने संपादित केलेले वर उल्लेखित केलेले पुस्तक ऑक्सफर्ड या प्रकाशकांनी प्रसिध्द केले. त्यात म. गांधी आणि प्रेमा कंटक यांच्यातील पत्रव्यवहार, त्यांच्या ललित-ललितेतर साहित्यातील कांही भाग, गांधी तत्त्वज्ञानाची गुंतागुंत, गांधीजींचे स्वातंत्र्यलढ्यांतील महिलांच्या भूमिकेविषयी मत, यांचा सविस्तर उहापोह केलेला आहे.

कु. प्रेमा कंटक विषयी एक लेख संघाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित केलेल्या 'वारसा कारवारचा' या पुस्तकांत आलेला आहे.

## 'कॉन्टिनेन्टल डिशेस'
## सौ. विद्या वागळे यांचे पाककृतीवरील पाचवे पुस्तक प्रकाशित

माहीम येथील सौ. विद्या मोहन वागळे यांची आतापर्यंत 'लज्जतदार कारवारी पाककृती' (तृतीयावृत्ती) 'चटकदार मालवणी पाककृती' (पंचमावृत्ती) 'अे-वन ब्रेकफास्ट' (तृतीयावृत्ती) व 'खाऊचा डबा' (द्वितीयावृत्ती) अशी चार पुस्तके प्रकाशित झालेली आहेत व त्यांचा निर्देश वेळोवेळी मुखपत्रिकेत आलेला आहे. या पुस्तकांच्या निघालेल्या आवृत्तीच्या संख्येवरुन या पुस्तकांची लोकप्रियता दिसून येते. अलीकडेच १६ डिसेंबर रोजी दत्तजयंतीच्या मुहुर्तावर त्यांचे **'कॉन्टिनेन्टल डिशेस'** हे पाचवे पुस्तक प्रकाशित झाले. त्यांत वेगवेगळ्या प्रकारचे सॉस, नूडल्स, स्टार्टर्स, थाय, मेक्सिकन, इटालियन, चायनीज, कॉन्टिनेन्टल अशा पाककृतींबद्दल आवश्यक ती माहिती दिलेली आहे.

(पृष्ठ ६४, मूल्य रु. ४०,
उपलब्ध : मनोरमा प्रकाशन, दादर – २४१४८२९९ व इतर पुस्तक विक्रेते)

## 'ग्यादी'

म्हणी किंवा कहावत म्हणजे कुठल्याही भाषेचे अलंकार. म्हणीशिवाय भाषा चेप्पी (बेचव) वाटते. भाजीला 'फोण्ण' तसे भाषेला म्हणी. आपली भाषा कोकणी आणि वृत्ती कुचिंद्री त्यामुळे आपल्याकडे रोजच्या व्यवहारामध्ये सुध्दा म्हणींना तोटा नाही.

कोकणीत म्हणींना 'ग्याद' असे म्हणतात ( 'ग्यादी' बहुवचनी) या शब्दाची व्युत्पत्ती सांगायची म्हणजे संस्कृतमध्ये मूळ 'गाथा' हा शब्द आहे. कन्नडमध्ये त्याचे 'गादे' असे रुपांतर झाले व त्यावरुनच 'ग्याद' असा अपभ्रंश झाला असे वाटते.

कोकणातील म्हणींचा उत्कृष्ट संग्रह म्हणजे श्री. मनोहर पै धुंगट यांचा 'कोंकणी म्हणीसागर', या पुस्तकाची त्रोटक माहिती मागे मुखपत्रिकेच्या अंकात आलेली आहे.

**(संदर्भ -'शारदा' मार्च १९३९)**


।। कै. दत्तात्रय वै. पालेकर (पोटली दत्ता), अमृतवाडी
यांचे कृतज्ञतापूर्वक पुण्यस्मरण ।।

**PRACHI FOODS & CATERING SERVICES**
**OF PRAKASH GUDE**

- All types of Delicious Food • Pickles & Papad
- Poojari Available for Devkritya & Dharmakritya
- Our Home Made Goan Speciality-Tikhase Phov / Churma
- Dry Fish - Suke Bangde, Mori & Sungta

A - 305, Best Swasadan, Liliya Nagar, Near Kamat Club,
Goregaon (West), Mumbai - 400 062. ( 9869423494/28744683 )

# जतीन्द्र पिकळे यांची नात जुई चव्हाण
# पंख चिमुकले, उंच भरारी !

'गुणिषु न च लिङ्गं न च वयः' असं एक संस्कृत सुभाषित आहे. आणि खरंच! गुणांना, कर्तृत्वाला वयाचं, जातीचं असं कोणतंच बंधन नसतं. अवघ्या तेराव्या वर्षी एक डॉक्युमेंटरी फिल्म बनवून तिला आंतरदेशीय स्तरावर मान्यता मिळवून देणाऱ्या 'जुई प्रशान्त चव्हाण' हिच्या उदाहरणाने या विधानाची सत्यता खरोखर अधोरिखितच केली आहे!

जुई ही अॅडव्होकेट दीपा आणि सॉलिसिटर प्रशान्त चव्हाण यांची कन्या श्री. जतीन्द्र व कै. सौ. सुधा पिकळे यांची नात. दादर येथील 'बालमोहन विद्यामन्दिर' या संस्थेत शिकणारी आठवीची विद्यार्थिनी. 'दि एमरल्ड सर्कल' या तिने तयार केलेल्या डॉक्युमेंटरीची अठराव्या 'इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल' मध्ये प्रदर्शित करण्यासाठी निवड झाली, 'लिटल डायरेक्टर्स' या शीर्षकाखाली.

'बालमोहन विद्यामन्दिर' येथे भरविण्यात आलेल्या 'डिजिटल फिल्म-मेकिंग वर्कशॉप' मध्ये 'श्रीमती नीलकान्ती पाटेकर' यांच्या मार्गदर्शनाखाली तिने ही निर्मिती केली. यातील फोटोग्राफी करताना तिची एक वर्गभगिनी 'तनुश्री शशितल' हिची तिला मदत झाली.

'दि गोल्डन एलिफन्ट' हा महोत्सव १४ नोव्हेंबर रोजी (पं. नेहरुंच्या जन्मदिनी) साजरा होत असतो. या वर्षी तो हैदराबाद येथे झाला. त्यात अठ्ठेचाळीस देशांचा सहभाग होता. व दोनशे फिल्म्स् सादर झाल्या. यांमध्ये 'जुई व तिच्या बालमोहन'चे (वर्ल्ड सेल्स् एजन्सी म्हणून) नाव झळकले, हे गौरवास्पदच!

फिल्मची दिग्दर्शिका या नात्याने आपल्या डॉक्युमेंटरीच्या विषयाबद्दल, तोच का निवडला याची मीमांसा जुईने केली आहे. 'एमरल्ड सर्कल' हे नाव तिने आपल्या आवडत्या 'शिवाजी पार्क'ला दिले आहे. तिची शाळा 'बालमोहन विद्यामन्दिर' शिवाजी पार्क परिसरातीलच पण त्याही पूर्वीच्या बालपणीच्या तिच्या स्मृती शिवाजी पार्कशीच निगडीत आहेत. आजी-आजोबांसोबत जाऊन झोपाळा-घसरगुंडीवर घेतलेला आनंद ही तिची पहिली आठवण! आजही शाळेतील खेळाचे तास, किंवा संध्याकाळचे खेळणे, अॅथलेटिक्सचे प्रशिक्षण या क्रीडांगणावरच होत असते म्हणूनच तिचे आग्रहाचे म्हणणे आहे की, 'शिवाजी पार्क जपले पाहिजे, त्याची निगराणी ठेवली पाहिजे!' त्यामुळे केवळ हिरवाईचेच संवर्धन होणार नाही, तर मुलांच्या खेळांचा आनंद घेण्याची, नागरिकांच्या फिरण्याची, मोकळ्या हवेचा आनंद घेण्याची सुविधा अबाधित राहील. तसेच चिवचिवणाऱ्या चिमण्या, हिरवेगार पोपट, झाडांवर घिरट्या घालणाऱ्या घारी या सर्वांनाही निर्धोकपणे उडता येईल!

आपल्या डॉक्युमेंटरीत जुईने या प्रख्यात शिवाजी पार्कचा इतिहासही साकार केला आहे. स्वातंत्र्यपूर्व कालापासून आजतागायत गाजलेल्या ऐतिहासिक सभा, येथे झालेले

शैक्षणिक कार्यक्रम, नानाविध प्रात्यक्षिके, असंख्य उपक्रम या सर्वांची ओळख तिने अनेकांच्या मुलाखतींतून करुन दिली आहे.

सध्या कार्यरत असलेल्या 'समर्थ व्यायाम मन्दिर', 'स्काऊट हॉल', 'बेंगाल क्लब' वगैरे संस्थांबरोबरच मैदानावर असलेल्या 'उद्यान गणेश मंदिर', 'कालीमाता मन्दिर' इत्यादींचेही चित्रण जुईने केले आहे. अर्थातच्, शिवरायांच्या पुतळ्याला मानवंदना आहेच!

इतक्या लहान वयात सामाजिक व पर्यावरणविषयक भान ठेवून केलेली ही निर्मिती जुईला व तिच्या शाळेला भूषणावह आहे.

पुढील जीवनात तिला अधिकाधिक प्रगती साधता येवो, ही शुभकामना!

**सौ. निलीमा नाडकर्णी, माहीम**

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

स्थळ : वेस्ट कोस्ट बीच रिसोर्ट - वसई (प.)

दिनांक : रविवार १२ जानेवारी २०१४

आकार : रु. ४०० प्रत्येकी
(५ वर्षावरील मुलांना पूर्ण आकार)

प्रस्थान : माहीम - मुलुंड - ठाणे

**आपल्या बँकेच्या नौपाडा ठाणे शाखेच्या खाते क्र. १८१६ मध्ये आकार भरण्याची सोय.**

संपर्क : सुरेश पालेकर - २५३६४३२८ / ९९६९४५५३७०
राजू बोरकर - २४३७७६५३ / ९८२०९१७८४१
मंजिरी कुलकर्णी - २५३३३२९६ / ९६६५०९८११७

**आकार भरल्यानंतरच नोंदणी**

## ठाणे मंचतर्फे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचे विवेचन

१७ व्या वर्धापनदिना निमित्त १६ ऑक्टोबर रोजी आयोजिलेला ठाणे मंचचा सुप्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचा 'रंग भावनाचे' हा कार्यक्रम म्हणजे विचारांना आणि भावनाना चालना देणारे एक उत्कृष्ट विचार मंथन ! सर्व प्रथम आपले मान्यवर एस. के. देसाई यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सौ. चित्रा कामत यांनी डॉ. नाडकर्णी यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची ओळख नेमक्या शब्दात करुन दिली. मानसोपचार, साहित्य, नाटक इ. अनेक क्षेत्रात सहजपणे वावरणाऱ्या डॉ. ची ओळख थोडक्यात करुन देणे कठीणच होते. स्मरणशक्ती, बुध्दीमत्ता आणि समयसूचकता, उत्कृष्ट वक्तृत्व यांचा सुंदर मिलाफ म्हणजे डॉ. आनंद नाडकर्णी, असे चित्राने सांगितले.

डॉ. नी सुरवातीसच 'भावना' म्हणजे आपल्या वैयक्तिक आयुष्याला पुरुन उरणारी गोष्ट असल्याचे सांगितले. भावनांक (E.Q.) आणि बुध्द्यांक (I.Q.) दोन्ही उच्च असतील तर माणूस यशस्वी होतो I.Q. उच्च व E.Q. कमी असेल तर गडबड होण्याची शक्यता असते असे ते म्हणाले. भावनिक शिक्षणाची गरज असल्याची सांगून त्याचा उपयोग नेतृत्वासाठी, आत्मविश्वास वाढवण्यासाठी नक्कीच होतो असे त्यांनी प्रतिपादन केले आपण नेहमी सकारात्मक, सुखदायी भावनांचीच जबाबदारी घेतो, पण नकारात्मक भावनांची जबाबदारी ही आपण कशी घ्यायची हे त्यांनी समजाविले. परिस्थिती, घटना नव्हे तर त्याकडे बघायचा आपला दृष्टीकोन आपल्या सकारात्मक व नकारात्मक भावनांना जन्म देत असतो. ते पुढे म्हणाले, 'काळ हेच औषध' असे म्हणतो पण ते अर्धसत्यच आहे. दु:ख कमी होत जाते ते दृष्टीकोन बदलल्यामुळे व आपल्या सर्व भावनांची जबाबदारी आपणच उचलणं हे महत्वाचं ! निलीमा व लालीमा या दोन स्त्रिया एकाच परिस्थितीला वेगवेगळ्या तऱ्हेने तोंड देतात ते सोदाहरण सांगितले. आपले विचार, भावना, प्राधान्य, ध्येय, सहनशीलता, विश्वास, सारासार विचार, वास्तवतेचा विचार, परिणामांचा विचार व परिस्थितीवरचे पर्याय इ. गोष्टींची सांगड कशी घालावी हे त्यांनी सहजपणे बोलता, बोलता सांगितले. भावनिक संतुलन गेल्यावर मनुष्य स्वत:वर, इतरांवर, नंतर परिस्थितीवर जगावर दोषारोप करतो. To keep emotional regulation, you have to focus on behavior, not person.

भावना अपार्टमेंटचे छान उदाहरण त्यांनी दिले. तळमजल्यावर संतुलीत असलेल्या भावना आणि वरच्या मजल्यावरच्या अनियंत्रित भावना ह्यातील फरक त्यांनी छान समजाविले. तळमजल्यावरच्या भावनांना सुनियंत्रित कसे ठेवावे तेही सांगितले. पूज्य विनोबाजी भावे यांच्या भगवत्‌गीतेवरील 'गीताई' वर डॉ. चा गाढा अभ्यास आहे आणि मानसशास्त्रामध्ये भावनांशी निवडीत अनेक ओव्यांचे स्पष्टीकरण दिले. विषयाचा सांगता करताना ते म्हणाले माणसाने स्वत:चा उध्दार स्वत:च करावा, प्रत्येकजण स्वत:च स्वत:चा मित्र व शत्रू आहे. कार्यक्रम एवढा रंगला की कोणालाही मध्यंतरांचे भानच राहिले नाही. बऱ्याच

जणांनी प्रश्न विचारुन निरसन करुन घेतले. शेवटी सौ. चित्रा कामत यांनी सर्वांचे आभार मानले. अल्पोपाहाराला कटलेट्स व खोबऱ्याची वडी व चहा घेताना खाण्याबरोबरच वैचारीक भूक भागल्याचे एक वेगळेच समाधान सर्वांच्या चेहऱ्यावर विलसत होते.

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**



## हसवाफसवी



| लग्नापूर्वी | लग्नानंतर |
|---|---|
| कुछ कुछ होता है | कुछ नही होता है |
| एक दुजे के लिये | सिर्फ बच्चों के लिये |
| दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे | बाकी लोग सुखी हो जायेंगे |
| चंद्रमुखी | ज्वालामुखी |
| कुंवारा बाप | बेचारा बाप |
| हम आपके है कौन | बरबादी का कारण |
| कभी कभी | नही कभी बी |
| आओ प्यार करें | और भी कुछ काम करें |
| राम और श्याम | काम और घाम |
| कभी खुशी कभी घम | कभी नही वेलकम |

## UNUSUAL STORY OF VIVEK AND SUJATA DIVEKAR

Shamu (or Vivek) is the younger of our two sons. Recovering from early sickness be became on ace student swimmer. In Badminton he was seeded 'Four' in the 'under 15' category in Mumbai during the 70's!

Now from sport into studies. His marks at Inter Science were insufficient for admission to medical or engineering courses. He and I researched a lot and ultimately he joined Konkan Krishi Vidyapeeth at Dapoli - a laid back small town in Ratnagiri district. He braved out the unusual new life, sleeping on a 'Chattayee' on the floor and digesting local food, but also enjoyed it. His other activities included cultivating his own 'earn-while you learn' Kalingada plot, becoming a member of a new 'band' group, doing excursions on bike and writing poetry! To top it all he passed the final B.Sc. (Ag.) examination standing first and grabbing both the gold medals!

After this, he did a two year MBA programme in finance and marketing from Spicer Memorial College in Pune, again topping the class.

He then moved to Palgher (W.Rly.) to develop and run his own 25 acre farm! I had purchased the land for this purpose. He and myself did all the laborious work of fencing, drilling to find three water bearing borewells, building a small three room structure as his and his supervisor's abode and a tool store. We purchased a 50CC mobike for his movements as the plot was eight km interior from Palghar!

It was tough going all the way. Looking back I now wonder why we put him into it and how he accepted and performed. A few of his difficulties.

There were encroachments on the plot and the 'Talati' dishonest and corrupt, was of no help.

For a loan of 16 lacs, the concerned bank asked him to submit justification report and charging interest rate at 14%. When sanctioned loan became operative, they charged 16% !

The first supervisor stole the initial watermelon crop and disappeared.

The 'Chikuwadi' project would have taken eight years to start yielding fruits. Vivek had to do some thinking and then planted 'Bombay Lily' and also vegetable plants like Bhendi and Mirchi to generate immediate income.

He had to recruit over fifteen tribal young boys and girls and train and motivate them.

He had to bring up a Tonga service to deliver the flowers to Palghar station and additionally to train a team of porters to load them in the train. The sacks were unloaded at Dadar by his 'Phoolwala' buyer.

I am amazed and proud that Vivek cheerfully went through all this rigour. I remember one Sunday when he came to our residence at Andheri after collecting his dues from Dadar phoolwala. He had a heavy haversack on his back and a grin on his face. I asked him 'What's up? ' He said 'see it for yourself'. The haversack was filled with 45000 rupees, the months earnings. In today's terms that would be about a couple of lacs.

Some other interesting events. One weekend my wife brought back Vivek's mosquito net which he was using as a pillow, for a wash. When she unfolded it to put it in the washing machine, out came a snake skin ('Kaat').

Another weekend, I joined the group harvesting a bed of 'khira' kakdi. After sorting out the bad ones, the deliverable heep weighed almost a ton! a bumper cash crop indeed!

Once Vivek took five weeks off to visit Israel putting me in charge of the farm. Some of my odd experiences which I think, are worth mentioning.

Five or six times I saw and killed large scorpions on the stone wall of our bangalow.

One night, while I was sleeping on a camp cot, a snake slithered across my tummy! when I suddenly woke up and put the torch on, he had disappeared.

Sujata, Vivek's wife was a vet working with Aarey colony and took a transfer to Aarey's Palghar's extension centre. But Palghar was a difficult location. They had difficulties bringing up one year old Dhruv. There were also cases of abduction of kids and waylaying lone motorcyclists. The young couple had too much tribulations in private life in spite of remarkable professional success. They decided to migrate to New Zealand leaving the farm in my charge.

In NL they had a good reception but could not continue in their fields. After a few trials and errors, Vivek studied and qualified in public accounting. Five years on, Sujata also took the Australian vet exam and started working.

They have a second son now and are well settled after a long battle early in life.

But India has lost one modern farmer and an excellent vet. What is India's loss is New Zealand's gain.

**(Sponsored)** **Ashok Yeshwant Divekar, Pune**

# मुंबई मंचतर्फे कारवारी आनंदमेळावा

कारवारी ज्ञातिबांधवांना दरवर्षी ज्याची उत्सुकता असते तो कारवारी आनंदमेळावा यंदा रविवार १ डिसेंबर रोजी जोगेश्वरीतील के. जी. एस. हाऊसिंग सोसायटीच्या पटांगणात मोठ्या दिमाखात साजरा झाला.

यावर्षी कारवारकार खाद्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना या निमित्ताने नात्यातील व परिचयातील माणसे भेटत होती. तरुण वर्गही बऱ्याच प्रमाणात उपस्थित होता. सायंकाळी साडेपाच वाजल्यापासून सर्व स्टॉलधारक आपापल्या खाद्यपदार्थांची मांडणी करुन सज्ज झाले होते. सुंगटाचे खोल, बांगड्याचे हुग्गे, मोरीचे धबधबे व तिसऱ्याचे वडे या खास पाककृतींबरोबर सुकरुंडे, हीट, तवसळी, मसाला फोव व चवडे हे तोंडाला पाणी सुटायला लावणारे कारवारी पदार्थ रसिकांना आकर्षित करीत होते. त्यातच चिकनचे विविध प्रकार, मटर पॅटिज व कोलंबी पुलाव अशा भरपूर खाद्यपदार्थांमुळे उशिरा येणाऱ्या रसिकांचा विरस झाला नाही. तहान भागविण्यासाठी कोकम-लिंबू सरबत, चहा व खास आपला कषाय ही पेये होतीच.

घरगुती उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी या मेळाव्यात पापड, लोणची, मसाले यासोबत तयार कपडे, चादरी व गिफ्ट आर्टिकलचे स्टॉलही होते. खाण्यात मग्न असलेली मंडळी या स्टॉल्सना भेट देवून त्यांचेही कौतूक करीत होती. संघाचे कार्याध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी यांनीही सर्व स्टॉलधारकांचा परिचय करुन घेत त्यांना शुभेच्छा दिल्या. उपस्थित खवय्यांना तसेच सर्व स्टॉलधारकांना हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल धन्यवाद.

आर्थिक प्रायोजकतेसाठी आपली एन. के.जी.एस.बी.बँक यंदाही पाठीशी उभी होती. आशना कन्स्ट्रक्शन्स, घनश्याम डेव्हलपर्स, सारस्वत बँक व लोकमान्य मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी यांचाही मोलाची सहभाग होता. के. जी. एस. को-ऑप हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणी मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे पटांगण या कार्यक्रमासाठी उपलब्ध करुन विशेष साहाय्य केले. या सर्वांचेच मुंबई मंचातर्फे आभार.

| **स्टॉलधारक** | **खाद्यपदार्थ/ इतर जिन्नस** |
|---|---|
| तारा गायतोंडे | तिसऱ्याचे वडे, सुकरुंडे, सुंगटाचे लोणचे, विविध मसाले |
| लता रामाणी | मोरी धबधबे, तवसळी, चवडे, रवा लाडू, नाचणी-सत्व |
| विद्या कसबेकर | मेथी भजी, चहा |
| स्वाती तेलंग | स्त्रियांचे कपडे (कुरती) |
| विद्या वागळे | बांगड्याचे हुग्गे, कोलंबी पुलाव, पाककलेवरील स्वलिखित पुस्तके |

| | |
|---|---|
| परिणिता शिरोळकर | बेळगावी कुंदा, चादरी, गिफ्ट आर्टिकल्स |
| रसिका गायतोंडे | गरम मसाला फोव (पोहे), कषाय |
| वैशाली पिकळे | भाजी-पाव, दाबेली |
| विनया नाडकर्णी | स्त्रियांचे कपडे (मॅक्सी व गाउन) |
| वर्षा राजाध्यक्ष | चिकन-कोल्हापुरी, विविध मसाले |
| मंजिरी साखरदांडे | शैक्षणिक क्लासेसची जाहिरात, आईस्क्रिम |
| वृषाली बोकील | चिकन बिर्याणी, मँगो मिल्कशेक |
| किशोर बोरकर/ आनंद कुलकर्णी | लिंबू व कोकम सरबत |
| देवीदास शेणॉय | कोंबडी-वडे, शेव, चिवडा, इत्यादी |
| लक्ष्मी पै | लोणची, पापड, सांडगे वगैरे |
| अनुराधा शानभाग | सुंगटाचे खोल, चिकन मसाला, हीट |
| दीपा वेंगसरकर | अंडा-कटलेट, शेवपुरी |
| मुंबई मंच | मटर पॅटीस, सांजोऱ्या |

**डॉ. विवेक कुलकर्णी, दादर**

## विजूले चुटकुले

**एक चली मैत्रिणीक** : तूं एक बरो वकील आशिल्लो तरुण पळयला अशे आयकता. तूं मागीर ताका लग्नाचे कित्याक विचारना?

**मैत्रीण** : हांवे ताका विचारले की तो प्रत्येक खेपेक मुकाल्ली तारीख दिता.

**पूत बापायक** : आमगले आडनांव 'वाघ' अशे आसतना तुमी मम्मीक कित्याक घाबरतात?

**बापूय** : तुका खबर ना? मम्मीले लगनापैलेचे नाव 'वाघमारे' अशे आशिल्ले.

**बापूय पुताक गजाल करता** : तूं कान पकड आणि धा खेपेक म्हण की हांव गाढव आसा.

**पूत** : हांव धा खेपेक कान पकडता, पण तुका गाढव म्हणचो ना

**विजय सदानंद वागळे, ठाणे**

# प्रतिक्रिया

## कै. अरविन्द कुलकर्णी एका आनंदयात्रीची सांगता

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात कै. अरविन्द कुलकर्णी यांच्याविषयी कारवारचे श्री. अरुण कुलकर्णी यांचा एक मृत्युलेख आला होता. त्या संदर्भात मी माझ्याही काही भावना व्यक्त करते.

सन १९९० पासून मी संघ व एज्युकेशन सोसायटी या उभय संस्थासाठी काम करण्यास सुरुवात केली. तेव्हांपासून एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त म्हणून त्यांच्याशी माझी प्रथम ओळख झाली. आरंभी मला त्यांच्याविषयी दरारा वाटे पण त्यांच्या मृदु स्वभावामुळे माझी भीती दूर झाली व त्यांच्या एकेका पैलूची मला ओळख झाली.

गरीबांविषयी त्यांना अत्यंत कणव. आपल्या संघाला व सोसायटीला आईवडिलांच्या पुण्यतिथीप्रसंगी ते नेहमी देणग्या द्यायचे. संजीवनी ट्रस्टमध्ये ते जीव ओतून काम करीत असत. महाराष्ट्र टाईम्समध्ये 'पंखाना बळ हवे' अंतर्गत हुशार पण गरीब मुलांना मदतीची योजना आखली होती त्यालासुध्दा ते साहाय्य करीत असत.

देशाटनाची त्यांना अत्यंत आवड. आपल्या मित्रमंडळीबरोबर देशातील व परदेशातील अनेक स्थळांना त्यांनी भेटी दिल्या आहेत, त्यांचे फोटो काढलेले आहेत. इतरांना आंखो देखा हाल सांगण्यांत त्यांना मजा वाटे. संगीत, नाटक व सिनेमा यांची भरपूर आवड. जातिवंत खवय्ये. मधुमेह असला तरी आईस्क्रिमवर ताव मारत. एका अर्थी ते आयुष्य भरभरुन जगले.

देहदान, नेत्रदान याविषयीही ते सक्रीय होते. त्यांच्या मृत्यूनंतर कांही तांत्रिक कारणामुळे त्यांचे देहदान होऊ शकले नाही पण नेत्रदान झाले. 'मरावे परी नेत्ररुपी रहावे' हे त्यांचे ब्रीदवाक्य सफल झाले.

त्यांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो ही त्यांच्या प्रिय श्रीशांतादुर्गा कुलदेवतेच्या चरणी प्रार्थना!

**मृदुला भांडारकर, गिरगांव**

## ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ - आवाहन

सौ. सुलभा (सिंधू) कुलकर्णी –ठाणे व सौ. लता पिकळे – मुलुंड यांनी काही वैयक्तिक कारणासाठी मंडळाचे काम यापुढे चालविण्याची असमर्थता व्यक्त केली आहे. तेव्हा ठाणे–मुलुंड या परिसरांतील ज्या व्यक्तींना हे सेवा कार्य करण्याची इच्छा असेल त्यांनी खालील व्यक्तींशी संपर्क साधावा

**सुरेश पालेकर**
९९६९४५५३७०

**मंजिरी कुलकर्णी**
९६६५०९८११७

## EDUCATIONAL ASSISTANCE TO NEEDY FAMILIES

A philanthropist from Pune desires to give financial assistance to a few economically backward NKGSB families on the following terms and conditions :

1. NKGSB family means both husband and wife should be NKGSB or either one of them
2. The gross income of the family should be less than Rs. 10,000/- pm.
3. One of the children should be college going.
4. The family, that is, he the husband, wife and college going student will have to come to Pune for interview when called. Traveling expenses upto Rs. 1500/- will be defrayed.
5. Application should be written in neat hand or got typed and sent by Speed post or courrier to

   **Shri D. W. Gaitonde**
   **F1, Athashree, Magarpatta Road,**
   **Mundwa, Pune 411 036.**
   **Last Date : 25th January 2014**

6. Application should contain information pertaining to first three conditions, telephone number, postal address and any other relevant information which will be useful for assessment.


**MIPL**

**MANGSIDHESH INVESTMENT PVT. LTD.**

| | | |
|---|---|---|
| Financial Advisors | Equity Trading | Public |
| Mutual Funds | RBI Bonds | LIC, Mediclaim |
| Postal Schemes | | |

**Corporate Office**

Bldg. No. 1, Flat No. 1A, Saraswati Baug, HFS Road, Jogeshwari (E), Mumbai - 400 060.

Tel.: 2836 2057 / 2824 5298 / 6457 1272 - 85

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| राहुल शिवानंद करूर, पुणे | व | दीपिका सुहास मंत्री, बोरीवली |
| मिहीर अविनाश कुलकर्णी, अंधेरी | व | सोनाली सुधीर गोकर्ण, पवई |
| रेश्मा शिवप्रसाद मुझुमदार, अंकोला | व | नरसिंह मुरलीधर प्रभु, यल्लापूर |
| मेधा दीपक नाडकर्णी, फोंडा | व | अमेय अवधूत रेगे, फोंडा |
| नीरज अशोक नेत्रावळी, घाटकोपर | व | अपर्णा एस्. भुक्तर, भांडुप |
| तेजस सुहास फेणे, बंगळूर | व | कनक अरूण बानावळी, घाटकोपर |
| विजयकृष्ण उदय पिकळे, व्हंडक्कल | व | अमृता आशिष नायक, बदलापूर |
| अक्षता आपुराय पिकळे, कुमटा | व | अजय आनंद पै, शिरसी |
| गौरी राजीव साखरदांडे, फोंडा | व | हरीश कृष्णनाथ धुमें, दाबोली |
| अक्षय मिलींद सुखटणकर, गोरेगांव | व | पल्लवी परशुराम राऊत, मुंबई |
| सागर प्रकाश वाघ, मुलुंड | व | प्राची अशोक दुसणकर, मुलुंड |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती अपर्णा प्रदीप बोरकर | वाकोला | १००० |
| २. | श्री. मारुति विश्वनाथ दळवी | ठाणे | २००० |
| ३. | श्री. महारुद्र वामन वागळे | मुलुंड | २००० |
| ४. | श्री. सुरेश रुद्रा नाडकर्णी | मुलुंड | १००० |
| ५. | श्रीमती अनघा आनंद वागळे | घाटकोपर | २००० |

## मुंबई मंच - नवी कार्यकारिणी - २०१३-१६

**कार्याध्यक्ष** : प्रेमानंद शं. नाडकर्णी

**कार्योपाध्यक्ष** : शैलेश गायतोंडे

**कार्यवाह** : प्रसाद गायतोंडे

**खजिनदार** : विवेक कुलकर्णी

**सभासद** : उदय कसबेकर, राजीव बोरकर, रसिका गायतोंडे, मिहीर तेलंग




मंगेशीचा मंगेश, म्हार्दोळची म्हाळसा
वेलिंगचा नृसिंह, मडकईची नवदुर्गा
अशा अतिशय प्रसिद्ध मंदिरांच्या
सान्निध्याने पवित्र झालेला परिसर.



**फ्लॅटस् उपलब्ध:** 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के
**प्रोजेक्ट मान्यता:** गोवा टाउन प्लॅनिंग
**कर्जसहाय्य:** नामवंत वित्त संस्था

a Project by: **कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिस:** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि: **2683 3841/47/ 72.** मोबा: **98336 36451**
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

**गोवा ऑफिस:** टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: **98209 33352, 98206 33321**

**गोवा साईट:** **95/1**, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## निधन

| | | |
|---|---|---|
| उज्ज्वला उमाकांत बक्षी (पूर्वाश्रमीच्या लता देवराव पिकळे) | (अंकोला) | सावंतवाडी |
| हेमंत मोहन देसाई | (कडवाड) | पारले |
| दुर्गा (अंबी) विश्वनाथ (गजा) धुमें | (बाड) | वरळी |
| गणपती घनश्याम गायतोंडे | (अस्नोटी) | वाळकेश्वर |
| सुभाष पुंडलीक इस्लूर | (शिरसी) | मालाड |
| उमा (शांतू) शंकर करूर | (शिरसी) | कारवार |
| भवानी (किशोर) नारायण कसबेकर | (शिद्र) | वरळी |
| माधुरी अनिल नाडकर्णी | (अंकोला) | गांवदेवी |
| महेश मुकुंद नाडकर्णी | (अगळी) | पारले |
| अमीता दिनेश नाडकर्णी | (सांवरपै) | पारले |
| सावित्री नागेश पालेकर | (कडवाड) | धारवाड |
| पुष्पशील गोपाळ पालेकर | (बाड) | माहीम |
| मंगला श्रीकांत पिंगे | (उळवी) | अंधेरी |
| विरुपाक्ष काशिनाथ वैष्णव | (सदाशिवगड) | अंधेरी |
| विजय शंकर संजगिरी | (गांवगेरी) | जोगेश्वरी |
| कमलाकर दत्तात्रय साखरदांडे | (हळगे) | कोल्हापूर |
| शुभांगी देवीदास वागळे | (बाड) | ठाणे |
| अनिल गोविंद वागळे | (बाड) | अंधेरी |


**Shailesh Gaitonde**
**Account Consultancy**

Office : S/70, Goyal Trade Centre, Shantivan, Borivali (E), Mumbai 400066.
**Tel.:** (Off.) 022-28974402 (Mob.) 98692 11055 • **Office Time :** 10.00 a.m. to 6.00 p.m.

**COMPUTERISED ACCOUNTS SERVICES**

- **FOR COMPANIES & PRIVATE FIRMS UPTO FINALISATION**
- **FOR CO-OP HSG SOCIETIES**
  - *Monthly / Quarterly Billing & Receipts of the Society*
  - *Accounts Books are maintained on Computer*
  - *Monthly or Annual Report*
  - *Statutory Audit from Panel Auditor*
  - *Finalization of Accounts*
  - *Administration of Society*
- **For Filling of Income Tax Returns & PAN Number**
- **For Personalized & Home Service**
- **(VACANCY FOR SOCIETY MANAGER, INTERESTED AND EXPERIENCED CANDIDATE PLEASE CONTACT)**

## II SHRI MANGUESH PRASANNA II



# At the sacred Feet of Shri Manguesh

**A DEVOTEE**

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### डॉ. अनघा नाडकर्णी यांजकडून पाच लाख रुपयांची देणगी

पुणे येथील डॉ. अनघा नाडकर्णी या रसायनशास्त्रातील डॉक्टरेट आहेत. वाडिया कॉलेजमध्ये केमिस्ट्री विषयाच्या विभाग प्रमुख म्हणून त्या निवृत्त झाल्या. त्यांचे पती श्री. अनंत नाडकर्णी हे कारवार येथे 'फोटोग्राफर भाऊ' म्हणून परिचित असलेले संतकवी कै. शिवराव त्रिंबक नाडकर्णी यांचे सुपुत्र. इण्डस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्सची उपकरणे बनविण्याच्या हायटेक क्षेत्रात त्यांचा व्यवसाय होता. डॉ. अनघा नाडकर्णी यांनी अलीकडेच पाच लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील एक लाख रुपये त्यांच्या नणंद श्रीमती कुसुम व भावोजी श्री. विश्वेश्वर बाळकृष्ण वागळे यांच्या स्मरणार्थ समाज सेवा निधीसाठी आहेत, दीड लाख रुपये सासूसासरे श्रीमती शांताबाई व श्री. शिवराव त्रिंबक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ आहेत, दोन लाख रुपये आईवडील श्रीमती रुक्माबाई (माणक) व श्री. विनायक कृष्ण गायतोंडे यांच्या स्मरणार्थ वृध्दसेवानिधीसाठी आहेत व ऊर्वरीत पन्नास हजार रुपये काका भवानीशंकर कृष्ण गायतोंडे (हिंदुहायस्कूलचे बी. के. गायतोंडे मास्तर) यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

### श्री. शंकर पिकळे कुटुंबीयांकडून आणखी दीड लाख रुपयांची देणगी

प्रशांत सोसायटी, माहीम येथे राहणाऱ्या श्रीमती निर्मला (लीला) शरद पिकळे यांचे ऑगस्ट २०१२ मध्ये दु:खद निधन झाले. त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पती श्री. शरद रामराव पिकळे, कन्या व जामात श्रीमती प्रतिमा (सोनू) व श्री. पांडुरंग (राजू) सदानंद देसाई यांनी दीड लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. त्यातील पन्नास हजार रुपये समाजसेवानिधीसाठी आहेत व एक लाख रुपये वृध्द सेवानिधीसाठी आहे. यापूर्वी श्री. पिकळे यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला एक लाख रुपयांची देणगी दिली होती.

### श्रीमती उषा प्रभाकर फडणीस यांजकडून आणखी एक लाख रुपयांची देणगी

मूळ हळगे येथील श्री. विश्वंभर वेंकटराव गायतोंडे यांची आर्थिक परिस्थिती ओढाताणाची होती. श्रीशांतादुर्गा हिच्या कृपेने त्यांची मुलेमुली नंतर चांगली कमवती झाली. ही सर्व मंडळी सातत्याने संघाला भरघोस देणग्या देत असतात. कै. गायतोंडे यांची एक कन्या श्रीमती उषा प्रभाकर फडणीस यांनी अलीकडेच आपली आई श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या स्मरणार्थ वृध्द सेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिलेली आहे. यापूर्वी २००२ साली त्यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला ५० हजार रुपयांची देणगी दिली होती.

## सौ. अर्चना व श्री अनिल बोरकरतर्फे ७५ हजार रुपयांची देणगी

'पेट्रॉफॅक' ही ऑईल अँड गॅस क्षेत्रातील जगातील सर्वांत मोठी कॉन्ट्रेक्टिंग कंपनी आहे. या कंपनीच्या मुंबई शाखेचे प्रमुख आहेत पारले येथील श्री. अनिल विठ्ठल बोरकर त्यांच्या हाताखाली १२०० कुशल तंत्रज्ञ काम करतात यावरुनच या कंपनीचा आवाका समजेल. श्री. बोरकर व त्यांच्या अर्धांगिनी सौ. अर्चना यांनी अलीकडेच अनिलचे आईवडील श्रीमती शांताबाई व श्री. विठ्ठल सदाशिव बोरकर, अर्चनाचे आईवडील श्रीमती उमा (कुसुम) व श्री मंगेश महाबळेश्वर कसबेकर व मावशी व भावोजी श्रीमती उमा (नलीनी) व श्री. देवीदास गोविंद कसबेकर यांच्या स्मरणार्थ संघाच्या समाजसेवा निधीसाठी ७५ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री. रमेश पिंगेतर्फे ७५००३ रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. रमेश गोविंद पिंगे यांनी आपली आई श्रीमती राधाबाई, वडील श्री. गोविंद दत्तात्रय पिंगे व पत्नी श्रीमती शैलजा यांच्या स्मरणार्थ अलीकडेच संघाच्या समाजसेवा निधीसाठी प्रत्येकी रु. २५००१ या प्रमाणे एकूण रु. ७५००३ एवढी देणगी दिलेली आहे.

## श्री.वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या इच्छेनुसार पन्नास हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी ज्ञातीच्या कार्यांत विशेष रस घेत असत. त्यांनी संघाला दोन वेळा एकेक लाख रुपयांच्या देणग्या दिलेल्या आहेत. त्यांचे सुमारे एक वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या हितचिंतकानी वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

### हेल्दी टिप्स

- दही, नाचणी, खजूर यात भरपूर कॅल्शियम असते.
- तीळ आणि गूळ हे पदार्थ सांध्याच्या लुब्रिकेशनसाठी उपयुक्त आहेत.
- नुसते सलाड खाण्यापेक्षा रोजच्या आहारात कोशिंबिरीचा वापर करा.
- व्यायाम केवळ जाड झाल्यावर करु नये. तर रोज थोडा व्यायाम शरीराला आवश्यक असतो.
- दिवसभर काही खायचं नाही आणि रात्री एकदा खायला बसलं की थांबायचं नाही असे केल्याने वजन वाढते.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून | १,५०० |
| २. | अनामिकाकडून | १,००० |
| ३. | आई-वडील श्रीमती राधाबाई व श्री. गोविंद दत्तात्रय पिंगे व पत्नी श्रीमती शैलजा यांच्या स्मरणार्थ श्री. रमेश गोविंद पिंगे यांजकडून | ७५,००३ |
| ४. | श्री. ओंकार दीपक गायतोंडे यांजकडून | ५,००० |
| ५. | हितचिंतकाकडून | ३,००० |
| ६. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ७. | श्रीमती रमाबाई व श्री. भालचंद्र वामन मुझुमदार यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अशोक यांजकडून | २१,००० |
| ८. | श्रीमती सविता किशोर सबनीस यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस फाऊंडेशनकडून | २,५०१ |
| ९. | श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस फाऊंडेशनकडून | २,५०१ |
| १०. | श्रीमती दुर्गा शिवानंद पालेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री विठ्ठल (बाळ) व स्नुषा श्रीमती लता यांच्याकडून | १०,००० |
| ११. | श्रीमती निर्मला शरद पिकळे यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. शरद रामराव पिकळे, कन्या श्रीमती प्रतिमा व जामात श्री पांडुरंग सदानंद देसाई यांजकडून | ५०,००० |
| १२. | श्रीमती शांताबाई व श्री. विठ्ठल सदाशिव बोरकर, श्रीमती उमा (कुसुम) व श्री. मंगेश महाबळेश्वर कसबेकर व श्रीमती उमा (नलीनी) व श्री. देवीदास गोविंद कसबेकर यांच्या स्मरणार्थ श्रीमती अर्चना व श्री. अनिल विठ्ठल बोरकर यांजकडून | ७५,००० |
| १३. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,१०० |
| १४. | संघाच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी श्री. सतीश विठ्ठल कसबेकर यांजकडून | १,१०० |
| १५. | नणंद श्रीमती कुसुम विश्वेश्वर वागळे व भावोजी श्री. विश्वेश्वर बाळकृष्ण वागळे यांच्या स्मरणार्थ डॉ. श्रीमती अनघा अनंत नाडकर्णी यांजकडून | १,००,००० |
| १६. | श्री. अविनाश गजानन बोरकर यांच्या ६० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | १,००१ |
| १७. | श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त कन्या श्रीमती संगीता अमर लाड यांच्याकडून | १०,००० |
| १८. | हितचिंतकाकडून | १०,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या १० व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. पराग यांजकडून | १५,००० |
| २. | श्रीमती सुनंदा विनायक मुझुमदार यांच्या पुण्यतिथीनिमित्त बहीण श्रीमती मेघा विनायक मुझुमदार यांजकडून | १,००० |
| ३. | श्रीमती शांताबाई व श्री. शिवराव त्रिबंक नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा डॉ. श्रीमती अनघा अनंत नाडकर्णी यांजकडून | १,५०,००० |

## अमृत महोत्सव निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | सार्वजनिक सभागृह ट्रस्टकडून | १,४०,००० |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती विमल (वत्सला) व श्री भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. राजन व स्नुषा श्रीमती स्वाती यांजकडून | २,५०० |
| २. | श्रीमती दर्शना व श्री. विवेक सच्चिदानंद वर्टी यांजकडून दोघां कुटुंबीयांच्या दिवंगत आत्म्यांसाठी | ५,००० |
| ३. | श्रीमती उमाबाई विश्वंभर गायतोंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कन्या श्रीमती उषा प्रभाकर फडणीस यांजकडून | १,००,००० |
| ४. | श्रीमती प्रेमा गंगाधर वागळे यांजकडून | १०,००० |
| ५. | श्री. गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमीष यांजकडून | २,००१ |
| ६. | अनामिकेकडून | ५,००० |
| ७. | श्रीमती रमाबाई व श्री. भालचंद्र वामन मुझुमदार यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अशोक यांजकडून | २१,००० |
| ८. | कै. श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या इच्छेनुसार हितचिंतकाकडून | ५०,००० |
| ९. | श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती विमल यांजकडून | ५,००० |
| १०. | श्रीमती निर्मला शरद पिकळे यांच्या १ ल्या पुण्यतिथीनिमित्त पती श्री. शरद रामराव पिकळे, कन्या श्रीमती प्रतिमा पांडुरंग देसाई व जामात श्री. पांडुरंग सदानंद देसाई यांजकडून | १,००,००० |
| ११. | श्री. मंगेश वसंत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ आई-वडील श्रीमती अलकनंदा व श्री. वसंत मनोहर नाडकर्णी यांजकडून | ३,००० |

| | | |
|---|---|---|
| १२. | श्री. मनोहर शंकर वागळे यांच्या १४ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. सतीश यांजकडून | १,००१ |
| १३. | श्रीमती आनंदाबाई (सुशीला) नीलकंठ तेलंग यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी पुत्र श्री. सुधीर, स्नुषा श्रीमती कांचनगौरी नातू श्री. नकुल व नातसून श्रीमती यामिनी यांजकडून | ५,००१ |
| १४. | श्रीमती शांताबाई व श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या स्मरणार्थ नातू श्री. अनिरुध्द व नात कुमारी अपर्णा दीपक बोरकर यांजकडून | ५,००१ |
| १५. | श्रीमती रुक्माबाई (माणक) व श्री. विनायक कृष्ण गायतोंडे यांच्या स्मरणार्थ कन्या डॉ. श्रीमती अनघा अनंत नाडकर्णी यांजकडून | २,००,००० |
| १६. | श्रीमती अनुराधा आनंद वर्टी यांजकडून ७० व्या वाढदिवसानिमित्त | ५,००० |
| १७. | श्री. विश्वेश्वर विठ्ठल कुलकर्णी यांच्या १२ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री. अमरीश यांजकडून | १०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. श्रीमती वैशाली विद्याधर कुलकर्णी यांजकडून | ५,००० |
| २. | पितृपक्षानिमित्त अनामिकेकडून | १,५०० |
| ३. | श्रीमती विमल (वत्सला) व श्री. भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. राजन व स्नुषा श्रीमती स्वाती यांजकडून | २,५०० |
| ४. | श्रीमती मालती व श्री. नीलकंठ धुमें व पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त श्री. चंद्रशेखर नीलकंठ धुमें यांजकडून | १,००० |
| ५. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या मुलांकडून | १,००१ |
| ६. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००१ |
| ७. | श्री. गणपती घनश्याम गायतोंडे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. सतीश याजकडून | २५,००० |
| ८. | श्री. भवानीशंकर कृष्ण गायतोंडे (हिंदु हायस्कूल कारवारचे बी. के. गायतोंडे मास्तर) यांच्या स्मरणार्थ पुतणी डॉ. श्रीमती अनघा अनंत नाडकर्णी यांजकडून | ५०,००० |

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.